सातारा दि.०७/०१/२०२२

# प्रसिध्दीपत्रक

## सातारा पोलीस भरती सन - २०१९

सातारा जिल्हा पोलीस घटकातील पोलीस शिपाई ७८ रिक्त पदांची लेखी परीक्षा, कागदपत्र पडताळणी, शारिरीक चाचणी व मैदानी चाचणी घेण्यात आलेली आहे.

१) प्रचलित शासन निर्णय / परिपत्रकान्वये व महाराष्ट्र पोलीस शिपाई (सेवाप्रवेश) नियम २०११ व (सुधारणा) नियम २०१९ नुसार तात्पुरती निवडयादी (Provisional Selection List) व तात्पुरती प्रतिक्षा यादी ( Provisional Waiting List ) तयार करण्यात आली असून सातारा जिल्हा पोलीस दलाचे अधिकृत प्रसिध्दीमाध्यम फेसबुक तसेच www.satarapolice.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

२) सदर तात्पुरती निवड यादी ( Provisional Selection List ) व तात्पुरती प्रतिक्षा यादी ( Provisional Waiting List ) यादीमधील उमेदवारांची निवड ही तात्पुरत्या स्वरुपाची असेल त्यामुळे निवड यादीमध्ये समावेश झालेल्या उमेदवारांना नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे समजण्यात येऊ नये.

३) तात्पुरती निवड यादी ( Provisional Selection List ) मधील उमेदवारांनी त्यांची मुळ कागदपत्रे / प्रमाणपत्रे फेर तपासणी करीता व कागदपत्र पडताळणी प्रक्रिये दरम्यान तपासण्यात आलेले मुळ कागदपत्र व सदर कागदपत्रांचा छायांकित प्रतीचा एक संच व चार आय कार्ड साईज फोटो घेवून पोलीस मुख्यालय, सातारा येथे सोमवार दि.१०/०१/२०२२ रोजी सकाळी १०.०० वा बिनचुक हजर राहण्याचे आहे.

४) तात्पुरती निवड यादी ( Provisional Selection List ) मधील निवड ही भरती निकषांची पुर्तता करण्याचे अधीन राहून करण्यात येणार असून त्यामध्ये अपात्र झाल्यास तात्पुरत्या निवड यादीमधील उमेदवाराचे निवड रद्द करण्यात येईल. याबाबत उमेदवाराचा कोणताही दावा/तक्रार/हक्क राहणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

पोलीस भरती निवड समितीच्या मंजूरीने

**पोलीस अधीक्षक, सातारा.**